**आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र**
**प्रशासकीय इमारत क्र 2, पहिला माळा, विंग - बी, सिव्हील लाइन्स, नागपूर**
**फोन नं : 0712-2551550/2551541 ई मेल-**commissionermgnregsmah@gmail.com

क्रमांक आयुक्तालय/मगांराग्रारोहयोमहा/ई-एमबी परिपत्रक/ 115 /2026 दिनांक 19.01.2026

# परिपत्रक

विषयः- मगांराग्रारोहयो अंतर्गत कामांसाठी ई-एम.बी प्रणाली राबविण्याबाबत

संदर्भः- 1) शा.नि. मग्रारोहयो-2020/प्र.क्र.47/रोहयो-10 दि. 13.4.2023

2) आयुक्तालयाचे पत्र क्र. आयुक्तालय/मगांराग्रारोहयोमहा/तक्रार/3179/2025 दिनांक 4.9.2025

3) आयुक्तालयाचे पत्र क्र. आयुक्तालय/मगांराग्रारोहयोमहा/तांत्रीक/3344/2025 दिनांक 23.9.2025

केंद्र शासनाने मगांराग्रारोहयो अंतर्गत निर्मित कामांच्या मोजमापासाठी ई-एम.बी प्रणाली राबविण्याचे निश्चित केले आहे. सदर प्रणाली प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित तांत्रीक अधिकारी/कर्मचारी यांना आयुक्तालयाच्या वतीने प्रशिक्षण देण्यात आले असुन कामांचे मोजमाप ई एमबी मध्ये नोंदविणे सुकर होण्याकरिता प्रशिक्षणावेळी सादरीकरणाची प्रत देखील प्रशिक्षणार्थींना देण्यात आली आहे. संदर्भिय पत्र क्र. 2 व 3 अन्वये ई एमबी प्रणाली राज्यात राबविण्यात येणार असल्याबाबत सर्व जिल्हयांना अवगत करण्यात आलेले आहे.

तथापी महाराष्ट्र राज्य राजपत्रित कृषि अधिकारी (जि.प.) संघटना यांचे कडून ई एमबी प्रणाली हाताळण्याबाबत स्पष्ट सुचना नसल्याचे निवेदन प्राप्त आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

मगांराग्रारोहयो अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची जबाबदारी व अधिकार याची संदर्भीय पत्र क्र.3 अन्वये निश्चिती खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

1. **हजेरीपत्रके ई एमबी प्रणालीवर नोंदविण्याकरिता जबाबदार अधिकारी / कर्मचारी**

अ) ग्राम पंचायत/पंचायत समिती यंत्रणेसाठी मगांराग्रारोहयो अंतर्गत कामांच्या हजेरीपत्रकाच्या मोजमापाची नोंदणी ई-एमबी प्रणालीवर करण्याची जबाबदारी तांत्रीक सहाय्यक (PTO) यांची राहील.

ब) इतर सर्व यंत्रणांसाठी संबंधित यंत्रणांचे तालुका स्तरावरील कार्यरत तांत्रीक अधिकारी/कर्मचारी (जि.प. बांधकाम, राज्य बांधकाम, मृद व जलसंधारण, जलसंपदा विभाग, तालुका कृषि अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी, वने तसेच सामाजिक वनीकरण ई.) यांची मगांराग्रारोहयो अंतर्गत कामांच्या हजेरीपत्रकाच्या मोजमापाची नोंदणी ई-एमबी प्रणालीवर करण्याची जबाबदारी राहील.

2. **ई एमबी हजेरी पत्रके नोंदविण्यात आल्यानंतर तपासणी करणारे अधिकारी**

मगांराग्रारोहयो अंतर्गत कामांना संदर्भ क्र.1 शासन निर्णयाव्दारे तांत्रीक व प्रशासकिय मान्यतेचे धोरण अधिक स्पष्ट व सुटसुटीत करून देण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित अधिकारी यांनी काम पाहावे. तांत्रीक मान्यता प्रदान करणारे अधिकारी ई-एम.बी प्रणाली मध्ये तपासणी अधिकारी म्हणून देखील कार्यरत असतील हे याव्दारे स्पष्ट करण्यात येत आहे.

ई-एम.बी प्रणाली राबविताना उक्त पध्दतीने जबाबदा-या पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन आपले स्तरावरून संबंधितांना निर्देश निर्गमित करण्यात यावेत अशा सुचना सर्व जिल्हयांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सर्व जिल्हयांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(डॉ.भरत बास्टेवाड, भा.प्र.से.)
आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार
हमी योजना महाराष्ट्र-नागपूर

प्रतिलिपीः-1) मा. सचिव (रोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई 32 यांना माहितीस्तव सविनय सादर
2) मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), नागपूर
3) मा.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
4) संचालक, महाराष्ट्र राज्य रेशिम संचलनालय, नागपूर
5) संचालक, मृद व जलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे
6) जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (सर्व)
7) मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (सर्व)
8) सहआयुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व
9) उपजिल्हाधिकारी (रोहयो) सर्व
10) उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. (नरेगा/पंचायत) सर्व